महाराष्ट्र शासन
**पोलीस अधीक्षक, कार्यालय भंडारा**
E-mail : sp.bhandara@mahapolice.gov.in ☎:- 07184 – 252440

क्रमांकः- पोअभं/कक्ष-१०/पोलीस भरती-कागदपत्रे-तपासणी/२०२६ भंडारा - 2935 दि. ०१/०४/२०२६

## प्रसिध्दीपत्रक

---ooo---

भंडारा जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५ च्या जाहिरातीत दर्शविल्याप्रमाणे पोलीस शिपाई संवर्गातील ५९ रिक्त पदासाठी शारीरीक चाचणी/ लेखी परिक्षा/एनसीसी सी प्रमाणपत्राचे एकत्रित गुणाच्या आधारे गुणवत्तेनुसार कागदपत्र पडताळणीच्या अधीन राहुन सामाजिक/ संमातर आरक्षण प्रवर्गनिहाय तात्पुरती निवडयादी व प्रतिक्षायादी भंडारा जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळ www.bhandarapolice. gov. in या वर दिनांक ३०/०३/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

१. सदर तात्पुरती निवडयादीतील ( **तात्पुरती प्रतिक्षायादी वरील उमेदवार वगळुन** ) उमेदवारांची मुळ कागदपत्रे पडताळणी करणे आवश्यक आहे. तात्पुरती निवडयादीतील उमेदवारांनी कागदपत्रे तपाणीसाठी दिनांक ७/०४/२०२६ रोजी ११.०० वाजता प्रत्यक्ष बहुददेशिय सभागृह, पोलीस मुख्यालय, भंडारा येथे उपस्थित रहावे.

२. तात्पुरती निवडयादीतील उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीसाठी येतांना ऑनलाईन आवेदन अर्जाची प्रत, चेस्ट क्रमांक, लेखी परीक्षा प्रवेशपत्र व आवेदन अर्जात नमुद केलेली सर्व मुळ कागदपत्रे **सोबत आणने आवश्यक असुन अनिवार्य आहेत**. मुळ कागदपत्रे आणण्यासाठी कुठल्याही प्रकारची संधी देण्यात येणार नाही. ज्या मुळ कागदपत्रांचा संच आणला आहे त्याचे २ झेराक्स संच सुध्दा सोबत आणावे तसेच ०६ पासपोर्ट साईज फोटो सोबत आणावे.

३. तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवार यांना दिनांक ०७/०४/२०२६ रोजी ११.०० वाजता मुळ कागदपत्र पडताळणीसाठी बोलविण्यात आलेले आहे. मुळ कागदपत्र पडताळणीसाठी बोलविण्यात आले म्हणुन उमेदवारांना नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही. याबाबत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४. मुळ कागदपत्र पडताळणीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांची सामाजिक/ समातंर प्रवर्गनिहाय गुणवत्तेनुसार अंतीम निवड करण्यात येईल याबाबत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**( नूरुल हसन भा.पो.से.)**
**पोलीस अधीक्षक भंडारा**